1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
SUBSCRIBE

• वर्ष : ०३ • अंक : १५६ • पुणे • शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### सोमवारी पाणीपुरवठा बंद

पिंपरी (आरंभ पर्व) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी सोमवार (२३ फेब्रुवारी) रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणताही खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

### लाकडी दांडक्याने बेदम मारहाण

पिंपरी (आरंभ पर्व) : कामगाराला ओरडल्याच्या कारणावरून एका व्यक्तीने ‘मी इथला सरपंच आहे, तुझे काय चाललंय, कामगारांना का मारतोस’ असे म्हणून वाद घातला. दुकानदाराला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. ही घटना आंबेठाण कोरेगाव फाट्यावर घडली. याप्रकरणी ४० वर्षीय व्यक्तीने उत्तर म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तरुणावर खुनी हल्ला

पिंपरी (आरंभ पर्व) : भांडण मिटवून तडजोड करण्यासाठी गेलेल्या एका तरुणावर कोयत्याने आणि दगडाने जीवघेणा हल्ला करण्यात आला. ही घटना गुरुवारी (१९ फेब्रुवारी) दुपारी एक वाजेच्या सुमारास राजाराम नगर, वाघजाई चौक, नवी सांगवी येथे घडली. याबाबत जखमी मुलाच्या आईने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रथमेश गणेश शिंदे (१९, राजाराम नगर, नवी सांगवी) याला अटक करण्यात आली आहे. दोन विधीसंघर्षीत बालकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकांना मुहूर्त मिळाला !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेची निवडणूक होऊन आणि निकाल जाहीर होऊन एक महिना पूर्ण झाला आहे. नवीन महापौर म्हणून भाजपने मंजुषा नागपुरे यांना संधी दिली आहे. उपमहापौर पदी परशुराम वाडेकर विराजमान झाले आहे. सभागृह नेते म्हणून गणेश बीडकर यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली असून स्थायी समितीच्या अध्यक्ष पदासाठी ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.





महापालिकेच्या विषय समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे. शहर सुधारणा, विधी, शिक्षण, महिला व बालकल्याण, क्रीडा तसेच नाव समिती या विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची निवडणूक कधी होणार याबाबत उत्सुकता होती. मात्र आता या निवडणुका कधी होणार हे निश्चित करण्यात आले आहे. पुढील आठवड्यात या सर्व विषय समित्यांच्या निवडणुका होणार आहे. शुक्रवारी २७ फेब्रुवारीला या निवडणुका होणार आहे. यासाठीचे अर्ज सोमवारी (२३ फेब्रुवारीला) स्वीकारले जाणार आहेत. दुपारी तीन ते सहा या वेळेत नगरसचिव कार्यालयात हे अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या हातात असलेल्या स्थायी समितीच्या अध्यक्ष पदासाठी सोमवारी ( २३ फेब्रुवारीला) निवडणूक होणार आहे. स्थायी समितीसाठी महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाने माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांना संधी दिली असून त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. स्थायी समितीमध्ये भाजपचे १२ सदस्य असल्याने भिमाले यांचा विजय निश्चित आहे.

स्थायी समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर विविध विषय समित्यांच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या नेमणुका केल्या जाणार आहेत. त्यासाठी ही निवडणूक होणार आहे. त्यानुसार अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक पुढील आठवड्यात शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी होणार आहे, अशी माहिती नगरसचिव योगिता भोसले यांनी दिली.

विषय समित्यांच्या बैठकीत या निवडणुका होतील. यासाठी पीठासीन अधिकारी म्हणून समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंढे यांची नेमणूक विभागीय आयुक्तांनी केली आहे. या निवडणुकीसाठी नामनिर्देशित पत्र स्विकारण्याचा दिवस सोमवार २३ फेब्रुवारी असणार आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ६ यावेळेत इच्छुकांना अर्ज दाखल करता येणार आहेत.

### या वेळेत निवडणुका

- विधी समिती : सकाळी ११.३०
- शहर सुधारणा समिती : दुपारी १२
- महिला व बाल कल्याण समिती : दुपारी १२.३०
- क्रीडा समिती : दुपारी १
- शिक्षण समिती : दुपारी १.३०
- नाव समिती : दुपारी २

# सहायक फौजदाराला पकडले

### तपासात मदत करण्यासाठी एक लाखांच्या लाचेची मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तपासात मदत करणे, तसेच जप्त केलेली गाडी परत करण्यासाठी एक लाखांची लाच मागणाऱ्या मुळशीतील पौड पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस फौजदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. तडजोडीत तक्रारदाराकडून ३५ हजारांची लाच घेताना सहायक फौजदाराविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पौड पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस फौजदार सचिन बाळासाहेब शिंदे (वय ४६, रा. ग्रीन फ्लॉरेन्झा सोसायटी, सूस, ता. मुळशी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने पौड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराविरुद्ध पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात जप्त केलेली गाडी परत करणे, तसेच तपासात मदत करण्यासाठी सहायक फौजदार शिंदे यांनी एक लाख रुपयांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दिली होती. तक्रारीची पडताळणी करण्यात आली. तक्रारदाराने तडजोडीत ३५ हजार रुपयांची लाच देण्याचे मान्य केले. त्यानंतर पौड पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या मुळशी चौकीच्या परिसरात शुक्रवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सापळा लावण्यात आला. तक्रारदाराकडून ३५ हजारांची लाच घेताना शिंदे यांना सायंकाळी पकडण्यात आले. रात्री उशीरा पौड पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करुन शिंदे यांना अटक करण्यात आली.

पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक दयानंद गावडे, प्रशांत चौगुले आणि पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे तपास करत आहेत.


# आधी लाखो रुपया भरा अन् नंतर पगारही मिळेना...

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयटीतील नोकरी म्हटली की मोठा पगार असे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. आयटीनगरी म्हणून ओळख असलेल्या पुण्यात आता आयटी क्षेत्राचे वेगळे चित्र समोर येऊ लागले आहेत आयटीतील नोकरीसाठी आधी दोन तीन लाख रुपये भरा नंतर पगारही मिळत नसल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे. अनेक आयटीयन्सची अशा प्रकारे फसवणूक झाल्याने अखेर त्यांना पोलिसांकडे धाव घ्यावी लागली आहे. आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची संघटना असलेल्या फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज यांनी पुण्यातील एका आयटी कंपनीविरोधात नोकरी फसवणुकीबाबत विमाननगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या कंपनीने नोकरी देण्याच्या आमिषाने नवीन उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारदारांच्या माहितीनुसार, संबंधित कंपनीकडे कोणतेही ग्राहक अथवा प्रकल्प नसताना नोकरीची हमी देत उमेदवारांकडून १ लाख ते ३ लाखांपर्यंत रक्कम घेण्यात आली. सुरुवातीला नोकरी मिळाल्याचे सांगितले गेले, मात्र प्रत्यक्षात कोणतेही प्रकल्प, पगार किंवा सातत्यपूर्ण रोजगार उपलब्ध करून देण्यात आला नाही. काही काळानंतर उमेदवारांना काम न देता सेवेतून कमी करण्यात आल्याचेही समोर आले आहे. फसवणुकीचा हा प्रकार पूर्वी उघडकीस आलेल्या काही नोकरी गैरव्यवहार प्रकरणांसारखाच असून, नोकरीच्या आमिषाने पैसे उकळण्याच्या पद्धतीने अनेक तरुणांची फसवणूक करण्यात आली आहे. नवोदित अभियंते आणि आयटी क्षेत्रात करिअर सुरू करणाऱ्या उमेदवारांना लक्ष्य केले जात आहे.



**या संदर्भात फोरमच्या प्रतिनिधींनी सहाय्यक पोलिस आयुक्त प्रांजल सोनावणे यांची भेट घेतली. त्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत कंपनीचे मालक आणि संबंधित सल्लागारांना चौकशीसाठी बोलावण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच पोलिस उपायुक्त सौम्या मुंडे यांचीही भेट घेण्यात आली असून, प्रत्येक संशयित कंपनीविरोधात स्वतंत्र तक्रारी आणि संबंधित कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही माहिती लवकरच पोलिसांकडे जमा करण्यात येणार असल्याचे फोरमने सांगितले.**



# विमानतळावर एआय आधारित मानवी संरचनेचा रोबो

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिल्यांदाच सामाजिक मानवी रचना (सोशल ह्युमनॉइड रोबो) असलेल्या रोबोची चाचणी घेण्यात येत आहे. ‘स्पेको एमआय-१’ (मूक्स रोबोटिक्स) द्वारे कृत्रित बुद्धिमत्तेवर आधारित (एआय) ‘रोबो’ विकसित केला असून, विमानतळाच्या टर्मिनलवरील सुरक्षिततेपासून हवाई प्रवाशांना विमान उड्डाणाची प्राथमिक माहिती देण्यापर्यंत रोबो योग्य पद्धतीने काम करतो किंवा नाही याची तपासणी करण्यात येणार आहे. या रोबोचे सुटे भाग आणून त्याची जोडणी शुक्रवारी करण्यात आली. या वेळी विमानतळावरील वातावरण, गर्दी आणि दिशादर्शक तपासणीसंदर्भात चाचणी घेण्यास सुरुवात करण्यात आली. प्राथमिक पातळीवर ही चाचणी होत असून, पुढील दोन ते तीन दिवस ही चाचणी सुरू राहणार आहे. विमानतळाच्या प्रवेशद्वाराजवळील चेक-ईन आउट, बोर्डिंग गेट, बॅगेज क्लेम इत्यादींसंदर्भात तपासणी करण्यात येणार आहे. या वेळी काही प्रवाशांनी रोबोबरोबर संवाद साधल्याच्या चित्रफितीही समाजमाध्यमावर प्रसारित झाल्या असून, प्रवाशांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे.

# हडपसरमध्ये मजुरांच्या वसाहतीत आग

### १९ झोपड्या भस्मसात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर भागातील राममनोहर लोहिया उद्यानाजवळ असलेल्या मजुरांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्री आग लागली. आगीत १९ झोपड्या, तसेच तीन दुचाकी भस्मसात झाल्या. आग लागल्यानंतर मजूर, तसेच कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. आगीमागचे कारण समजू शकले नाही.

पुणे-सोलापूर रस्त्यावर राममनोहर लोहिया उद्याना आहे. उद्यानाच्या मागील बाजूस मजुरांची वसाहत आहे. मध्यरात्री अडीचच्या सुमारास वसाहतीतील एका झोपडीला आग लागली. झोपड्या तात्पुरत्या स्वरुपात बांबू आणि पत्र्याचा वापर करुन बांधण्यात आल्या आहेत. गृहोपयोगी साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. आग भडकल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांनी पेट घेतला. आग लागलात वसाहतीतील मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पाच बंब, टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भढकल्याने जवानांनी चहुबाजूंनी पाण्याचा मारा सुरू केला. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

आगीत १९ झोपड्या भस्मसात झाल्या, तसेच तीन दुचाकीही जळल्या. आगीत कपडे, धान्य, तसेच अन्य साहित्य जळाले. मध्यरात्री आग लागल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. मात्र, प्रसंगावधान राखून मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, विलास दडस यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

हडपसरमधील राम मनोहर लोहिता उद्यानाजवळ तात्पुरत्या स्वरुपात झोपड्या उभारण्यात आल्या आहेत. या भागात राहणारे मजूर आणि कुटुंबीयांचे हातावर पोट आहे. आग लागल्यानंतर त्वरीत वसाहतीत सर्वजण बाहेर पडल्याने गंभीर दुर्घटना टळली. आगीत गृहोपयोगी साहित्य जळाल्याने मजुरांच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले.





### बोपोडीत भंगार मालाच्या दुकानात आग

**बोपोडीतील छाजेड पेट्रोल पंपाजवळ असलेल्या भंगार मालाच्या दुकानाला शनिवारी पहाटे आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. आगीत कोणी जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली. उन्हाळा सुरू झाल्यानंतर आग लागण्याच्या घटना वाढतात. उष्णतेमुळे आग भडकते. शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडतात, अशी माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.**



# संघर्ष लहान प्रेरणा मोठी

### जपानमधील इचिकावा झूमधील ‘पंच’ माकड पुन्हा चर्चेत : छळाचे व्हिडिओ व्हायरल

**जपान (दै. आरंभ पर्व)**

जपानमधील इचिकावा सिटी झूमधील ‘पंच’ या लहान माकडाचा पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेचा विषय झाला आहे. नव्याने समोर आलेल्या व्हिडिओंमध्ये इतर माकडांकडून त्याला ओढत नेऊन त्रास दिला जात असल्याचे दिसत असून, हे दृश्य पाहून अनेकांनी संताप आणि दुःख व्यक्त केले आहे. काही दिवसांपूर्वी पंच इतर माकडांशी जुळवून घेत असल्याचे दिसत होते, मात्र या नव्या व्हिडिओंनी परिस्थिती वेगळी असल्याचे स्पष्ट केले. पंचचा जन्म २६ जुलै २०२५ रोजी झाला होता. जन्मावेळी त्याचे वजन केवळ ५०० ग्रॅम होते. पहिल्यांदाच आई बनलेल्या माकडीने त्याची काळजी न घेतल्याने तो लहानपणापासूनच एकाकी राहिला. इतर माकडांशी नाते जुळवण्यात अडचणी येत असल्याने त्याने एका मऊ ओरांगुटान खेळण्याला बिलगून सुरक्षिततेची भावना शोधली. त्या भावनिक दृश्यांचे व्हिडिओ इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि जगभरातून सहानुभूती व्यक्त झाली.

नंतर काही अपडेट्समध्ये पंच हळूहळू इतर माकडांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले होते, त्यामुळे त्याची परिस्थिती सुधारेल अशी आशा निर्माण झाली होती.



मात्र, अलीकडे व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये मोठ्या माकडाने पंचला जमिनीवर ओढत नेऊन मारहाण केल्याचे दिसते. घाबरलेला पंच रडत पळून जाऊन पुन्हा आपल्या खेळण्याला बिलगल्याचेही या क्लिपमध्ये दिसते. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर होत असून, त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

अनेक नेटिझन्सनी झू प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. पंचला आधीपासून छळ होत असल्याची माहिती असतानाही त्याला त्याच पिंजऱ्यात का ठेवले जाते, असा सवाल अनेकांनी केला. काहींनी त्याला स्वतंत्र सुरक्षित जागा देण्याची मागणी केली आहे.

पंचची कथा निरागसता, असुरक्षितता आणि बंदिस्त वातावरणातील प्राण्यांच्या कठीण वास्तवाचे चित्र दाखवते.

प्राणीसंग्रहालये नैसर्गिक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करत असली तरी काही प्राण्यांना सामाजिकदृष्ट्या जुळवून घेणे कठीण ठरते, हे या घटनेतून दिसून येते.

सध्या मऊ खेळण्याला बिलगलेला हा छोटा माकड पुन्हा एकदा इंटरनेटवर एकाकीपणाचे प्रतीक बनला असून, त्याच्या सुरक्षिततेबाबत ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# AI व सायबर धोका संशोधन केंद्राची घोषणा

## सायबर लवचिकता मजबूत करण्यासाठी आणि विश्वसनीय AI स्वीकाराला गती देण्यासाठी बहु-हितधारक उपक्रम

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

क्लाउड सुरक्षा क्षेत्रातील अग्रणी कंपनी Zscaler, Inc. आणि भारतातील प्रमुख दूरसंचार सेवा प्रदाता Bharti Airtel यांनी संयुक्तपणे AI & Cyber Threat Research Center – India स्थापनेची घोषणा केली आहे. भारताची सायबर लवचिकता बळकट करणे, महत्त्वाच्या क्षेत्रांचे संरक्षण करणे आणि सुरक्षित कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) स्वीकाराला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हे संशोधन केंद्र “In India, For India” या संकल्पनेवर आधारित




असून, खाजगी क्षेत्र, सार्वजनिक संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि सरकार यांच्यातील सहकार्याला चालना देणार आहे. दूरसंचार, बँकिंग, ऊर्जा यांसारख्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यावश्यक क्षेत्रांचे संरक्षण आणि कुशल सायबर मनुष्यबळ तयार करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे.

भारतामध्ये वेगाने वाढणाऱ्या डिजिटल परिवर्तनामुळे सायबर हल्ल्यांचा धोका वाढत आहे. Zscaler च्या ThreatLabz India संशोधन टीमने दरमहा लाखो घुसखोरी प्रयत्न नोंदवले असून, राष्ट्र-प्रायोजित सायबर हेरगिरी, शून्य-दिवस (zero-day) हल्ले आणि सार्वजनिक-खाजगी क्षेत्रांवरील वाढते आक्रमण याकडे लक्ष वेधले आहे.

Zscaler दररोज ५०० अब्जांहून अधिक व्यवहार प्रक्रिया करणाऱ्या Zero Trust Exchange™ प्लॅटफॉर्मद्वारे सायबर धोका गुप्त माहिती उपलब्ध करून देईल. Airtel IoT व मोबाईल ट्रॅफिकवरील सखोल निरीक्षण क्षमतेद्वारे संशयास्पद हालचालींची जलद ओळख पटविण्यास मदत करेल. पुढील काळात अन्य सार्वजनिक व खाजगी संस्थांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाणार आहे. एअरटेलचे कार्यकारी उपाध्यक्ष गोपाल विट्ठल यांनी सांगितले की, “ग्राहक आणि देशाच्या डिजिटल परिसंस्थेचे संरक्षण ही आमची सातत्यपूर्ण बांधिलकी आहे. या भागीदारीतून सुरक्षित आणि सक्षम डिजिटल भारत घडविण्यास मदत होईल.” Zscaler चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी जय चौधरी म्हणाले, “भारताच्या डिजिटल विस्ताराच्या प्रमाणाला पारंपरिक सुरक्षा मॉडेल्स पुरेसे नाहीत. Zero Trust आर्किटेक्चरवर आधारित आधुनिक सुरक्षाव्यवस्था उभारणे अत्यावश्यक आहे.” या उपक्रमामुळे भारताच्या सायबर संरक्षण व्यवस्थेला बळकटी मिळण्यासोबतच डिजिटल आत्मनिर्भरतेकडे वाटचाल वेगाने होणार असल्याचे मानले जात आहे.



## राष्ट्रीय महामार्ग ४८ वर भीषण अपघात; तरुणाचा मृत्यू

**राजगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

हरिश्चंद्री (ता. भोर, जि. पुणे) येथील सातारा–पुणे मार्गावर मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. श्रद्धा हॉटेलसमोर झालेल्या या अपघातात १९ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

मृत तरुणाचे नाव श्रेयस बाळू साळवे (वय १९, रा. धावडवाडी, ता. खंडाळा, जि. सातारा) असे आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणेहून साताऱ्याकडे जाणारा टेम्पो (क्र. MH12 JF 5364) चालक अक्षय बापू सकटे (वय २९, रा. धनगरवाडी, ता. खंडाळा, जि. सातारा) याने भरधाव वेगात व निष्काळजीपणे वाहन चालविताना रस्त्यावरील मध्यभागी असलेला डिव्हायडर ओलांडला. त्यानंतर समोरून साताऱ्याकडून पुण्याकडे येणाऱ्या ट्रकला (क्र. MP09 AL 9308) जोरदार धडक दिली.



**या प्रकरणी संबंधित टेम्पो चालकाविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास राजगड पोलीस स्टेशन करीत आहे. दरम्यान, महामार्गावरील वाढते अपघात चिंतेचा विषय ठरत असून वाहनचालकांनी वेगमर्यादा पाळून सुरक्षित वाहनचालना करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.**

या धडकेत टेम्पो चालकास किरकोळ व डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली. ट्रक चालक फरीद मोहम्मद यांनाही दुखापत झाली आहे. मात्र टेम्पोमधील श्रेयस साळवे यास गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला.

## चलनात खोट्या नोटांचा सुळसुळाट

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

शहरासह राज्यातील विविध भागांत खोट्या चलनी नोटांचा सुळसुळाट वाढल्याचे प्रकार समोर येत आहेत. विशेषतः ५०० रुपयांच्या नोटांमध्ये बनावट नोटा आढळत असून, किरकोळ दुकानदार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक यांची फसवणूक होत आहे. अलीकडेच पोलिसांनी केलेल्या कारवाईत काही ठिकाणी बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळ्यांचा पर्दाफाश झाला आहे. बाजारपेठ, पेट्रोल पंप, तसेच गर्दीच्या ठिकाणी या नोटा सहजपणे वापरल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेकांना नोट खोटी असल्याचे लक्षात येईपर्यंत उशीर झाल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. तज्ज्ञांच्या मते, खोट्या नोटा ओळखण्यासाठी




- **नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन**

नोटेवरील सुरक्षा चिन्हे, वॉटरमार्क, धागा आणि छपाईची गुणवत्ता नीट तपासणे आवश्यक आहे. बँका आणि प्रशासनानेही नागरिकांना याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, संशयास्पद नोट आढळल्यास ती त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा बँकेत जमा करावी, तसेच संबंधित माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## ऑरेलियाने अनन्या पांडेसह केले एसएस’२६ कलेक्शनचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला फॅशन अँड रिलेट लिमिटेड कंपनीचा, स्त्रियांच्या एथिक कपड्यांचा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय ब्रॅण्ड ऑरेलियाने स्प्रिंग समर’२६ कलेक्शन बाजारात आणून भारतीय कपड्यांतील नवीनतम प्रवाहासंाठी ‘गो-टू’ ब्रॅण्ड हे आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. #HameshaTrending या बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडेचा समावेश असणाऱ्या उत्साही अभियानाद्वारे हे कलेक्शन सर्वांपुढे आणले गेले आहे. ऑरेलिया हा फॅशनच्या बाबतीत सजग असणाऱ्या तरुण स्त्रियांसाठी नेहमीच पसंतीचा पर्याय राहिला आहे. आपल्या मूळ भारतीय सौंदर्याच्या कल्पना न विसरता नवीन प्रवाहांसोबत राहणे आवडणाऱ्यांना स्त्रियांमध्ये हा ब्रॅण्ड विशेष लोकप्रिय आहे. ज्या स्त्रियांना




दररोज काळासोबत, आत्मविश्वासपूर्ण आणि विनासायास शैलीदार राहायला आवडते त्यांच्या व्यक्तिमत्वाचा गौरव ब्रॅण्डतर्फे या नवीन कलेक्शनद्वारे केला जात आहे.स्प्रिंग समर ’२६ कलेक्शनद्वारे भारतीय पोशाखांतील अगदी नवीन प्रवाह पुढे आणले गेले आहेत, अद्ययावत कुर्ता सिल्हुएट आणि फ्लुइड को-ऑर्ड सेट्सपासून खेळकर बाह्या, वैशिष्ट्यपूर्ण नेकलाइन्स, अधिक सौम्य रंग आणि नवीन प्रवाहानुरूप फुलांच्या डिझाइन्सपर्यंत या ऋतूसाठी चपखल असलेले सगळे प्रकार यात आहेत. सुतासारख्या घाम टिपून घेणाऱ्या वस्त्रप्रकारांत तसेच कमी वजनाच्या मिश्र वस्त्रप्रकारांत तयार करण्यात आलेले हे कलेक्शन आरामाला आणि ऋतूला अनुसरून पोशाखाला प्राधान्य देते. सहज बसतील असे फिट्स, तलम कापड आणि मिक्स-अँड-मॅच सेपरेट्स यांमुळे दैनंदिन वापराचे कपडे, खास प्रसंगी घालण्याचे कपडे, उन्हाळी ऋतूंतील उत्सवांसाठी घालण्याचे कपडे आणि प्रवासाचे कपडे यांत वैविध्य राखले जाण्याची निश्चिती होते. आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेडच्या टीसीएनएस डिव्हिजनचे चीफ एग्झिक्युटिव ऑफिसर अनंत दागा म्हणाले, “फॅशनच्या सातत्याने उत्क्रांत होत राहणाऱ्या क्षेत्रात काळाला धरून राहण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रियांना ऑरेलिया ब्रॅण्ड सातत्याने आपला वाटला आहे. या स्पष्ट स्थानावरून आम्ही भारतीय पोशाखांतील नवीनतम प्रवाहांसाठी ‘गो-टू डेस्टिनेशन’ ही ऑरेलियाची भूमिका अधिक दृढ करत आहोत. स्प्रिंग समर ’ट्वेंटीसिक्स कलेक्शन आणि #HameshaTrending अभियान ही आमची फॅशन क्षेत्रातील आघाडी भक्कम करण्याच्या दिशेने टाकलेली धोरणी पावले आहेत. त्याचबरोबर उपलब्धता, आरामदायीत्व आणि समावेशकता व्यापक प्रमाणावर देऊ करण्यासाठीही आम्ही हे कलेक्शन आणि अभियान आणले आहे. अनन्याच्या तरुण ग्राहकांशी असणाऱ्या घट्ट नात्यामुळे आमचे उद्दिष्ट अधिक व्यापक होते आणि ब्रॅण्डच्या वाढीच्या महत्त्वाकांक्षेशीही हे सुसंगत आहे.”

## थोडक्यात पण महत्वाचे




### जवळगाव प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**बार्शी (आरंभ पर्व) : दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळगाव नं. २, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे विविध कलागुणदर्शनाने नटलेले वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, देशभक्तीपर सादरीकरणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमातून आपले कला कौशल्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विस्तार अधिकारी मा. श्री. ज्ञानेश्वर जाधव साहेब, पंचायत समिती सभापती मा. अनिल काका डिसले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मा. अभिजीत कापसे यांच्या शुभहस्ते तसेच केंद्रप्रमुख मा. शशिकांत चव्हाण साहेब यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विस्तार अधिकारी मा. ज्ञानेश्वर जाधव साहेब यांनी शाळेच्या कार्याचे कौतुक करत “ही शाळा तालुक्याला मार्गदर्शक ठरणारी आहे,” असे गौरवोद्गार काढले. कार्यक्रमास गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. अनिता धेंडे, उपसरपंच मा. अभिजित डिसले, मा. समाधान ढेंगळे, शाळेचे माजी मुख्याध्यापक मा. विष्णु मस्के सर तसेच ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा. अशोक कापसे, उपाध्यक्ष मा. अमोल कापसे, सदस्य संतोष चव्हाण, अक्षय चव्हाण, समाधान ढेंगळे, प्रविण ढेंगळे, सौ. ज्ञानेश्वरी राऊत, सौ. प्रियंका कापसे, सौ. रागिणी कापसे तसेच सर्व पालक व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. मुख्याध्यापक सोमेश्वर देशमाने सर, सहशिक्षक प्रशांत सरवदे, जयवंत काशीद सर व सौ. भाग्यश्री गाडेकर मॅडम यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. सुर्यकांत निचळ सर यांनी केले. कार्यक्रमास उपस्थित राहून शोभा वाढविल्याबद्दल सर्वांचे शाळेच्या वतीने मुख्याध्यापक सोमेश्वर देशमाने सर यांनी आभार मानले.**

### पुण्यात धायरी केंद्रावर शिक्षकाकडूनच कॉपी; प्रकार सीसीटीव्हीत कैद

**पुणे (आरंभ पर्व) : राज्यात दहावी-बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त आणि तणावमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी राज्य शिक्षण मंडळाने विशेष उपाययोजना केल्या असतानाही पुण्यातील धायरी परिसरातील एका परीक्षा केंद्रावर गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. या केंद्रावर एका शिक्षकानेच विद्यार्थ्यांना कॉपी पुरवल्याचा प्रकार सीसीटीव्हीत कैद झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळच्या सत्रात रसायनशास्त्राचा पेपर सुरू असताना हा प्रकार घडला. केंद्रावर नियुक्त असलेल्या एका शिक्षकाला कथितरित्या चिरीमिरी देऊन चहासाठी बाहेर पाठवण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या शिक्षकाने वर्गाचा ताबा घेत विद्यार्थ्यांना लाँगबुक वाटल्याचे आणि कॉपी करण्यास प्रवृत्त केल्याचे सांगितले जात आहे. शाळेचा निकाल शंभर टक्के लागावा या उद्देशाने हा प्रकार घडल्याची चर्चा केंद्र परिसरात सुरू आहे. दरम्यान, परीक्षा नियंत्रक अचानक वर्गात दाखल झाल्यानंतर गोंधळ उडाला. संबंधित घटनांचे चित्रीकरण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. या प्रकरणी शिक्षण विभागाकडून चौकशी सुरू असून, संबंधित शिक्षकांवर कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परीक्षा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.**

## किंगने वाढत्या संस्कारांची संगीत परंपरा नव्या रूपात साकारली

**हा अल्बम भारताच्या समृद्ध संगीत ओळखीला अभिवादन करतानाच त्या ध्वनीला जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न आहे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पॉप आयकॉन किंगने आपला आतापर्यंतचा सर्वात मोठा अल्बम राजा हिंदुस्तानी सादर केला आहे. आधुनिक पॉप शैलीतून भारताच्या समृद्ध संगीत परंपरेचा भव्य उत्सव या प्रकल्पात अनुभवायला मिळतो. या अल्बममध्ये किंगने सुरेल कथनशैली स्वीकारत भारतीय संगीत क्षेत्रातील प्रभावशाली आवाजांसोबत सहकार्य केले आहे श्रेया घोषाल, सुनिधी चौहान, शान, कुमार सानू आणि रेखा भारद्वाज. वॉर्नर म्युझिक इंडिया द्वारे प्रदर्शित हा अल्बम भारतीय संस्कृतीत या दिग्गजांनी निर्माण केलेल्या कालातीत जादूचा सन्मान करतो आणि त्या भावनात्मक ध्वनीविश्वाला नव्या पिढीसाठी पुन्हा साकारतो. पहिली दोन सिंगल्स “कमाल है” आणि “जो इश्क हुआ” अल्बमच्या सुरेल दिशेला सुरुवातीपासूनच ठरवतात. “मजा प्यार करने में” हा रोमँटिक केंद्रबिंदू ठरतो, ज्यात किंग आणि कुमार सानू नॉस्टॅल्जिया



आणि आधुनिक ताजेपणाचा सुंदर संगम घडवतात. या गाण्याच्या व्हिडिओमध्ये कुमार सानू किंगसोबत स्क्रीनवर दिसतात पिढ्यांना जोडणारा एक दुर्मिळ आणि पूर्णत्वाचा क्षण दिसून येतो. यानंतर सुनिधी चौहान सोबत उत्साही, रेगे शैलीचा स्पर्श असलेला “ये दिल मुझको तू दे दे” येतो, तर “ये सफर” मध्ये शानसोबत मैत्री आणि सहप्रवासाचा उबदार सन्मान आहे. श्रेया घोषालसोबतचे “हाल ए दिल” अलौकिक शांतता निर्माण करते, तर रेखा भारद्वाज “वो पहला अक्षर” मध्ये काव्यात्म गूढता आणतात. शेवटचे सोलो गाणे “आहिस्ता आहिस्ता” भावपूर्ण गीतलेखन आणि उत्सवी संगीत निर्मितीसह आनंददायी शेवट घडवते. या प्रकल्पाबद्दल बोलताना किंग म्हणतो: “राजा हिंदुस्तानी हा माझ्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या संगीताचा सन्मान करत माझ्या शैलीला पुढे नेणारा प्रयत्न आहे. ज्यांच्या गाण्यांवर मी वाढलो त्या दिग्गजांसोबत काम करणे ही स्वतःमध्येच अविश्वसनीय गोष्ट आहे. त्यांच्या आवाजांनी मला सूर, भावना आणि कथनशैली समजायला शिकवले. आता त्यांच्यासोबत गाणे म्हणजे केवळ सहकार्य नाही; तो पूर्णत्वाचा क्षण आहे. हा अल्बम पारंपरिक आणि आधुनिक, नॉस्टॅल्जिया आणि वर्तमान पिढ्यांना जोडण्याबद्दल आहे . भारतीय पॉप संगीत परंपरेशी जोडलेले असूनही जागतिक, आधुनिक आणि निर्भय असू शकते, हे दाखवणे हा उद्देश आहे. माझ्यासाठी राजा हिंदुस्तानी हे कृतज्ञता आणि आत्मअभिव्यक्ती दोन्ही आहे.” या अल्बमच्या माध्यमातून किंग सुरेलता, भावविश्व आणि कथनशैलीकडे पुनरागमन करत काळाच्या दोन टोकांना जोडणारा संगीत प्रवास घडवतो. राजा हिंदुस्तानी आता सर्व प्रमुख स्ट्रिमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.




## ‘परिवर्तन २०२६’ सोहळ्यास उत्फुर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (BBNG) तर्फे आयोजित वार्षिक बिझनेस कॉन्क्लेव्ह ‘परिवर्तन २०२६’ हा नुकताच वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल येथे दिमाखात पार पडला. देश-विदेशातील १२०० हून अधिक ब्राह्मण उद्योजकांनी या मेगा संमेलनात सहभाग नोंदवत नेटवर्किंग, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचा नवा विक्रम प्रस्थापित केला. ब्राह्मण समाजातील उद्योजक, उद्योगपती व व्यावसायिकांना एकत्र आणून परस्पर सहकार्याची मजबूत साखळी निर्माण करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. दोन दिवसीय कार्यक्रमात पॅनेल चर्चासत्रे, प्रेरणादायी व्याख्याने, फायरसाईड चॅट्स, बी-टू-बी कॉन्क्लेव्ह, पॉवरपॉईंट सादरीकरणे व परस्परसंवादी सत्रांचा समावेश होता. ‘परिवर्तन’चे कॅप्टन श्री. नंदन गुमास्ते यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाला अखिल भारतीय संत समितीचे महासचिव परमपूज्य स्वामी जितेंद्रानंद सरस्वती, राज्यसभेच्या सदस्या डॉ. मेधा कुलकर्णी, कामत हॉटेल्स समूहाचे कार्यकारी संचालकडॉ. विठ्ठल व्यंकटेश कामत, उद्योगपती श्री. प्रकाश भालेराव आणि श्री. उदय निरगुडकर यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते BBNG स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले तसेच प्रायोजकांचा सन्मान करण्यात आला.

## जेईई मेन २०२६ मध्ये आकाश इन्स्टिट्यूट पुण्याची शानदार कामगिरी

**९९.९९ पर्सेंटाइलसह दीक्षांत शर्माचा टॉप स्कोर**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) अंतर्गत पुण्यातील 16 विद्यार्थ्यांनी जेईई मेन 2026 (सेशन 1) मध्ये पुन्हाएकदा उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्यासातत्यपूर्ण यशाची साक्ष दिली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) यांनी16 फेब्रुवारी रोजी जाहीर केलेल्या निकालानुसार, जेईई मेन 2026 मध्येआकाश इन्स्टिट्यूट, पुणे येथील 16 विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

दीक्षांत शर्माने 99.99 पर्सेंटाइलसह टॉप स्कोरर म्हणून आपली चमकदार कामगिरी दाखवली. त्याच्यानंतर तेजस कोरेने 99.78 पर्सेंटाइल, तर पियुष यादवने 99.75 पर्सेंटाइल मिळवले. शिवप्रसाद लक्ष्मण देवकरने 99.71 पर्सेंटाइल मिळवले, तर प्रत्युष आलोक कुमार तिवारीने 99.54 पर्सेंटाइलसह उत्कृष्ट यश संपादन केले.

कैवल्य विजय घरगेने 99.44 पर्सेंटाइल मिळवले, तर पार्थ निकमने 99.43 पर्सेंटाइल प्राप्त केले. आर्या दिवेकरने 99.35 पर्सेंटाइल मिळवले. निखिल बेवाल आणि सोहम निशिकांत पाटील या दोघांनीही 99.31 पर्सेंटाइल मिळवले. दिव्या दीपक कटारियाने 99.29 पर्सेंटाइल, तर उत्कर्ष प्रदीप निबेने 99.20 पर्सेंटाइल मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. ओम देशमुखने 99.15 पर्सेंटाइल मिळवले, हसिनी चिक्काला हिने 99.08 पर्सेंटाइल मिळवले, वरद महाडिकने 99.05 पर्सेंटाइल साध्य केले, तर पर्ल सोमाणीने 99.04 पर्सेंटाइल मिळवले.

## २७ फेब्रुवारी रोजी क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यमचा प्रीमियर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

या वर्षाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळाले. आता हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे. मराठी ZEE5 वर 27 फेब्रुवारी 2026 रोजी या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित आणि क्षिती जोग व विराज गवस, उर्फी काझमी आणि अजिंक्य धमाल यांची निर्मिती केलेला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा संवेदनशील सामाजिक विषयावरील चित्रपट आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याचा आनंद, जिद्द, शाश्वतता आणि सांस्कृतिक अभिमान यांचा गौरव या चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. समकालीन आव्हानांना सामोरे जाताना आपली मुळे आणि ओळख जपणाऱ्या एका मराठी शाळेचा आणि या शाळेशी संबंधित माणसांचा भावनिक प्रवास या चित्रपटात प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. मराठी भाषा गौरव दिनी या चित्रपटाचा डिजिटल प्रीमियर होणार असल्यामुळे




या प्रसंगाला अधिक अर्थ प्राप्त झाला आहे. मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व आजही तितकेच कायम असल्याचा संदेश या निमित्ताने अधिक ठळकपणे अधोरेखित करण्यात आला आहे.

सचिन खेडेकर, अमेय वाघ, प्राजक्ता कोळी (मराठी चित्रपटातील पदार्पण), क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर, हरीश दुधाडे, पुष्कराज चिरपुटकर आणि कादंबरी कदम अशा उत्तम कलाकारांची मांदियाळी असलेल्या या चित्रपटाने चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांच्या मनाला भावला. आता डिजिटल प्रीमियरच्या माध्यमातून तो आणखी अनेकांना प्रेरणा देण्यासाठी सज्ज झाला आहे. सशक्त कथानक, प्रभावी अभिनय आणि मराठी माध्यम शिक्षणसंस्थांना दिलेली भावनिक मानवंदना यामुळे क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या मनात घर करण्यास सज्ज झाला आहे. हा चित्रपट 27 फेब्रुवारी 2026 पासून केवळ मराठी ZEE5 वर पाहता येणार आहे.

चित्रपट मराठी ZEE5वर आणण्याबाबत झी मराठीच्या मुख्य चॅनल अधिकारी आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, “मराठी भाषा दिवस हा आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. पिढ्यान् पिढ्या चालत आलेली संस्कृती, ओळख आणि कथा सांगण्याची परंपरा जपणाऱ्या भाषेचा हा उत्सव आहे. क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटाच्या मराठी ZEE5वरील प्रदर्शनाच्या माध्यमातून, या राज्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत मराठी भाषा आणि मराठी शाळांचे महत्त्व अधोरेखित करणारी कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा मान आम्हाला लाभत आहे. ZEE5मध्ये आमची बांधिलकी केवळ कंटेंट उपलब्ध करून देण्यापुरती मर्यादित नाही. मराठी प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेत उत्कृष्ट कथा जाणून घेता येतील, अनुभवता येतील आणि त्यांच्याशी जोडता येईल, असे व्यासपीठ उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे. या दिशेने आमचा ‘लँग्वेज पॅक’ उपक्रम हे महत्त्वाचे पाऊल आहे. या उपक्रमामुळे वापरकर्त्यांना मराठीत सहजपणे कंटेंट पाहता येतो आणि भाषा ही अडथळा न ठरता, दर्जेदार मनोरंजनापर्यंत पोहोचण्याचा दुवा ठरते. मराठी कंटेंट इकोसिस्टिम अधिक भक्कम करण्यासाठी आणि प्रेक्षकांना रुचतील अशा अर्थपूर्ण कथा सादर करण्यासाठी आम्ही सातत्याने कटिबद्ध आहोत.”

निर्माती आणि अभिनेत्री क्षिती जोग म्हणाल्या, “क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटाची निर्मिती एका खोल भावनिक जाणीवेतून झाली आहे. एक निर्माती म्हणून मला नेहमीच असे वाटत आले आहे की सिनेमामध्ये संस्कृती जपण्याची, संवाद सुरू करण्याची आणि आपण कोण आहोत याची आठवण करून देण्याची ताकद आहे. हा चित्रपट अत्यंत प्रेमाने आणि या चित्रपटातून देण्यात आलेल्या संदेशावर असलेल्या ठाम विश्वासातून साकारण्यात आला आहे.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६









# नवले ब्रिजवरील अपघातांचे खरे कारण काय?

## अमावस्या-स्मशानभूमी नव्हे, मानवी चुका व रस्त्याची रचना जबाबदार




### उपाययोजना सुरू, पण अपघात कायम

- अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने काही उपाययोजना केल्या आहेत.
- उतारावर दर ५०० मीटरवर रंबल स्ट्रिप्स बसवण्यात आल्या
- वेगमर्यादा ताशी ४० किमी निश्चित करण्यात आली
- अवजड वाहनांची तांत्रिक तपासणी व ब्रेक सिस्टम तपासणी सक्तीची केली
- रस्ता रुंदीकरण, स्वतंत्र लेन आणि वाहतूक पोलिसांची गस्त वाढवण्यात आली
- रात्रीही दिसतील असे धोक्याचे फलक बसवले

तरीही अपघात पूर्णपणे थांबलेले नाहीत.

### अमावस्या-स्मशानभूमीचा संबंध नाही

अपघात अमावस्येला होतात, अशी चर्चा होत असली तरी मोठ्या अपघातांच्या तारखा पाहता त्यांचा अमावस्येशी संबंध आढळत नाही. त्याचप्रमाणे सेल्फी पॉईंटजवळ असलेल्या स्मशानभूमीमुळे अपघात होतात, ही धारणा देखील चुकीची असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले ब्रिज परिसरात वारंवार होणाऱ्या भीषण अपघातांमुळे 'अमावस्या' किंवा जवळील स्मशानभूमी यांच्याशी संबंध जोडून अफवा पसरत असल्या, तरी प्रत्यक्षात अपघातांचे मुख्य कारण मानवी चुका, तीव्र उतार आणि वाहतुकीची प्रचंड गर्दी असल्याचे निरीक्षण समोर आले आहे. १८ फेब्रुवारी रोजी जांभुळवाडी बोगद्याजवळ भरधाव डंपरने चार-पाच वाहनांना धडक दिल्याची घटना घडली. त्यानंतर नवले व वडगाव ब्रिजदरम्यान आणखी एका वाहनाला धडक देऊन डंपरने पेट घेतला. जीवितहानी टळली असली तरी काही जण जखमी झाले आणि वाहतूक काही काळ ठप्प झाली.

याआधी १३ नोव्हेंबर २०२५ रोजी ब्रेक फेल झालेल्या कंटेनरने जवळपास २० वाहनांना धडक दिल्याने आठ जणांचा मृत्यू झाला होता. तसेच २० नोव्हेंबर २०२२ रोजी ट्रकने ४८ वाहनांना धडक दिल्याची मोठी दुर्घटना घडली होती. २०२१ ते २०२५ या काळात नवले ब्रिज परिसरात एकूण ४२ अपघात होऊन ४४ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

तज्ज्ञांच्या मते, कात्रज बोगद्याकडून नवले ब्रिजकडे येताना सुमारे ४.३ टक्के तीव्र उतार आहे. या उतारावरून वाहनांचा वेग अचानक वाढतो. पुढे सर्व्हिस रोड, चौक आणि विविध फाटे असल्याने वाहनांची गर्दी होते. ब्लाइंड स्पॉटमुळे चालकांना पुढील वाहतूक स्पष्ट दिसत नाही आणि अपघाताचा धोका वाढतो.

या मार्गावर ट्रक, कंटेनर, चारचाकी, दुचाकी व रिक्षांची मोठी गर्दी असते. लेनचे पालन न होणे, उतारावर वाहन न्यूट्रलमध्ये टाकणे, ब्रेकचा अति वापर आणि बेजबाबदार वेग यामुळे ब्रेक फेल होण्याच्या घटना घडतात आणि मोठे अपघात होतात.

तज्ज्ञांचे मत आहे की, नवले ब्रिजवरील दुर्घटनांचे मूळ कारण अंधश्रद्धा नसून रस्त्याची रचना, तीव्र उतार, वाहतुकीची गर्दी आणि चालकांची बेपर्वाई हेच आहे. त्यामुळे अफवांपेक्षा वाहतूक शिस्त आणि सुरक्षित ड्रायव्हिंगकडे अधिक लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आंबेगाव खुर्द येथे शिवजयंती उत्साहात साजरी

पुणे (आरंभ पर्व) : आंबेगाव खुर्द येथे विश्वरत्न फाउंडेशनचे संस्थापक नरेंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी ॲड. अतुल सोनावणे यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, स्वराज्य संकल्पना आणि न्यायनिष्ठ राज्यकारभारावर प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. रविंद्र पाटील उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास नागरिक, युवक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### खानापूर केंद्रात पेन देऊन दहावीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

खानापूर (आरंभ पर्व) : पुणे जिल्हा शिक्षण मंडळ अंतर्गत महात्मा गांधी विद्यालय, खानापूर येथे इयत्ता दहावीच्या सार्वजनिक परीक्षेचे केंद्र सुरू झाले असून, परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पेन देऊन उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा व आत्मविश्वास निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. केंद्रप्रमुख शिवराम साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्वागत उपक्रम राबविण्यात आला. दक्षता समितीचे सदस्य तसेच श्री काळभैरवनाथ पतसंस्था चे संस्थापक रघुनाथ यादव, उपाध्यक्ष पै. नंदकुमार जावळकर, संचालक बाबासाहेब शिंदे, माजी विद्यार्थी संघाचे सल्लागार सदस्य व सेवानिवृत्त शिक्षक शशिकांत जाधव आणि पोलीस पाटील गणेश सपकाळ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पेन देण्यात आले. यावेळी बोलताना रघुनाथ यादव म्हणाले, "विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व प्रामाणिकपणे परीक्षा देत आपल्या विद्यालयाचा १०० टक्के निकाल लावून शाळेचा आणि पालकांचा गौरव वाढवावा." खानापूर केंद्रामध्ये खानापूर, पानशेत, डोणजे, मालखेड, रुळे, खामगाव, गिरीनगर, सांगरून आदी परिसरातील शाळांमधील एकूण ३७९ विद्यार्थी परीक्षेस बसले आहेत. परीक्षा अत्यंत सुरळीत व शांततेत सुरू असल्याची माहिती केंद्रप्रमुख शिवराम साबळे यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत खानापूर केंद्रातील वातावरण प्रेरणादायी ठरले आहे.

### हडपसरमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी; उपाययोजना कुठे हरवल्या?

पुणे (आरंभ पर्व) : हडपसर परिसरात दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक कोंडी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत मुख्य रस्ते, चौक आणि उड्डाणपूल परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. परिणामी शेकडो नागरिकांना दररोज वेळेचा व इंधनाचा मोठा फटका बसत आहे. हडपसर हा आयटी पार्क, औद्योगिक व निवासी वसाहतींनी वेढलेला वेगाने विकसित होणारा भाग आहे. मात्र वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरण, सिग्नल समन्वय, पार्किंग नियंत्रण आणि सार्वजनिक वाहतुकीची प्रभावी व्यवस्था दिसून येत नाही. स्थानिकांच्या मते, काही ठिकाणी अतिक्रमणे, रस्त्यावरील अनियमित पार्किंग आणि अपूर्ण कामांमुळे परिस्थिती अधिकच बिकट होते. सिग्नलवर दीर्घ प्रतीक्षा, अरुंद सेवा रस्ते आणि अव्यवस्थित रिक्षा-बस थांबे यामुळे वाहतूक विस्कळीत होते. पुणे महानगरपालिका आणि पुणे शहर वाहतूक पोलीस यांनी काही उपाययोजनांची घोषणा केली असली तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी अद्याप नागरिकांना जाणवत नाही. स्मार्ट सिग्नल प्रणाली, वन-वे नियोजन, अतिक्रमणांवर कारवाई आणि सार्वजनिक वाहतूक बळकटीकरण यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवण्याची गरज आहे. नागरिकांचा सवाल स्पष्ट आहे. दररोजच्या वाहतूक कोंडीला जबाबदार कोण? आणि या प्रश्नाचे ठोस उत्तर प्रशासन कधी देणार? हडपसरच्या वाढत्या लोकसंख्येसोबत पायाभूत सुविधांचाही वेगाने विकास होणे आवश्यक आहे. अन्यथा वाहतूक कोंडीचा हा विळखा आणखी घट्ट होणार, यात शंका नाही.

## पुणे महापालिकेतच घोटाळा? कचरा विभागात मोठा गैरप्रकार?




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका च्या कचरा व्यवस्थापन विभागात गंभीर अनियमितता सुरू असल्याची चर्चा सध्या शहरात रंगू लागली आहे. कचरा वाहतूक विभागात कर्मचाऱ्यांची हजेरी, वाहनांची नोंद आणि प्रत्यक्ष कामकाज यामध्ये मोठी तफावत असल्याचे आरोप पुढे येत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी "सोयीने हजेरी" लावली जात असून प्रत्यक्षात मात्र कामावर उपस्थिती नसल्याच्या तक्रारी आहेत. कचरा उचलण्याच्या वेळा, फेऱ्यांची संख्या आणि प्रत्यक्षात झालेली सेवा यामध्येही फरक असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.


महापालिकेने कचरा वाहतूक वाहनांवर GPS प्रणाली, बायोमेट्रिक हजेरी आणि डिजिटल मॉनिटरिंगची घोषणा केली होती. मात्र ही यंत्रणा पूर्णपणे प्रभावीपणे राबविली जात नसल्याचा आरोप होत आहे. डिजिटल नियंत्रण प्रणाली कार्यान्वित झाल्यास पारदर्शकता वाढेल आणि गैरप्रकारांना आळा बसेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

शहरातील काही भागात कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने दुर्गंधी, आरोग्य समस्या आणि डासांचे प्रमाण वाढत आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.

महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि डिजिटल यंत्रणा प्रभावीपणे लागू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत महापालिका प्रशासनाची अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नसून, सत्य परिस्थिती काय आहे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'गुरुचॅट्स'चे 'क्वांटमफोर्स'तर्फे लोकार्पण




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माणसाच्या विचारशक्तीला, एकाग्रतेला आणि संशोधक वृत्तीला चालना देण्याऱ्या 'गुरुचॅट्स' या डिजिटल संवाद मंचाचे दूरदृश प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. क्वांटमफोर्स इन्कच्या वतीने या 'एआय' आधारित प्रणालीची निर्मिती करण्यात आली असून, भारतासह अमेरिकेत 'गुरुचॅट्स'द्वारे मुक्त, निर्भय व सुरक्षित संवाद करता येणार आहे, अशी माहिती 'क्वांटमफोर्स'चे मुख्य कार्यकारी अधिकारी व संशोधक भूपेंद्र चौधरी यांनी दिली.

भूपेंद्र चौधरी म्हणाले, "गुरुचॅट्स हे एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड आणि नॉन-रेकॉर्डेबल डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. यामध्ये संभाषण केवळ त्या सत्रापुरते मर्यादित राहते. डिजिटल संवादातील 'रेकॉर्डिंग कल्चर' आणि अति-स्वयंचलनाला पर्याय देण्याचा त्यामागील उद्देश आहे. तंत्रज्ञानामुळे संवाद अधिक कार्यक्षम झाला असला, तरी त्याने लक्ष केंद्रीकरण आणि बौद्धिक धैर्य कमी केले आहे. हा प्लॅटफॉर्म विद्यापीठे, कॉर्पोरेट नेतृत्व संघ, सल्लागार, शिक्षक, थिंक टँक आणि समुदाय गटांसारख्या उच्च-विश्वासाच्या वातावरणासाठी तयार करण्यात आला आहे, जिथे गोपनीय चर्चा आवश्यक असते. 'कॉग्निटिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर' म्हणून गुरुचॅट्स लक्ष, स्मरणशक्ती, विश्लेषण क्षमता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढवण्यासह मानवी विचार प्रक्रियेला प्रोत्साहन देते."

या संवाद मंचाच्या निर्मितीमागे प्राचीन अथेन्समधील 'निक्स' या ऐतिहासिक ठिकाणाची प्रेरणा आहे. त्या ठिकाणी नागरिक निर्भयपणे सार्वजनिक चर्चा करत असत. त्याची कुठेही नोंद होत नाही. त्याच धर्तीवर आधुनिक डिजिटल जगात विश्वासार्ह व मुक्त संवादाची जागा निर्माण करण्याचा प्रयत्न या मंचातून करण्यात आला आहे. हा प्लॅटफॉर्म विश्वासार्ह, व्यावसायिक वातावरण निर्मिती करणारा आहे. कोणत्याही माहितीची चोरी, मोडतोड करण्याचा धोका यामध्ये राहणार नाही. कंपनी सुरक्षित संवाद क्षेत्रात विस्तार करत असताना अधिकृत माध्यमांद्वारे भागीदारीच्या संधी, संस्थात्मक परवाने आणि प्रारंभिक प्रवेश उपलब्ध करून देणार आहे, असेही त्यांनी नमूद केले. कंपनीनुसार अमेरिका आणि भारत येथे एकत्रित लॉंच करण्यामागे शैक्षणिक व बौद्धिक चर्चेची मजबूत परंपरा असलेल्या बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करण्याची रणनीती आहे.

लॉंचनंतर होणाऱ्या जागतिक परिषदेत शिक्षक, संस्थात्मक भागीदार आणि प्रारंभिक वापरकर्ते सहभागी होऊन खाजगी, उपस्थिती-आधारित संवादाच्या भविष्यासंदर्भात चर्चा करणार आहेत. सुरक्षित संवाद क्षेत्रात विस्तार करताना अधिकृत माध्यमांतून भागीदारी संधी, संस्थात्मक परवाने आणि अर्ली-ॲक्सेस सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असे चौधरी यांनी सांगितले.

# महिला आरोग्य विषयक जनजागृती फॅशन शो संपन्न

### विजेत्यांना अल्बम सॉन्ग मध्ये काम करण्याची संधी मिळणार




**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

अलीकडे फॅशन शोचे पर्व फुटलेले आहे. तीन वर्षांच्या बालकांपासून पन्नाशी गाठलेल्या महिला - पुरुषांचेही फॅशन शो होत असतात. या सर्व फॅशन शो पेक्षा एक आगळा - वेगळा, सामाजिक बांधिलकी आणि महिला आरोग्य जनजागृती घडवणारा फॅशन शो कशिश सोशल फाउंडेशनच्या सहकार्याने स्वप्नील गोगावले एन्टरटेनमेंट आणि आई फाऊंडेशन यांच्या वतीने एलप्रो मॉल,चिंचवड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

मिस / मिसेस / मिस्टर आणि किड्स अशा विभागात ही स्पर्धा संपन्न झाली. यावेळी डॉ. महेश थोरवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अर्चना माळी, स्वप्नील गोगावले,डॉ.अजितसिंह पाटील ,राज रणदिवे,अर्चना माघाडे,निलाक्षी जाधव,केतकी शिरबावीकर,स्मिता मधुकर,डॉ.स्मिता बारवकर आई फाउंडेशनच्या सई वढावकर, कशिश सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष, पुण्याचे पॅडमॅन योगेश पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कशिश प्रॉडक्शन्स चे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर ओम जगदाळे ने देखिल रॅम्प वॉक केला.

फॅशन शो विषयी माहिती देताना योगेश पवार म्हणाले, आपल्या सामाजिक कर्तव्याच्या जाणिवेतून कशिश सोशल फाउंडेशनच्या वतीने मासिक पाळी या अतिशय महत्वाच्या आणि नाजुक विषयांवर जनजागृती करण्याचे काम केले जाते. या उपक्रमाचा भाग म्हणून सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात येणार आहे. फाउंडेशनच्या वतीने आजपर्यंत काश्मिर खोऱ्यासह पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या दुर्गम भागात गरजू महिलांना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले आहे.

या शो मधूनही तीच जागृती आम्ही करत आहोत.

स्वप्नील गोगावले म्हणाले, , मी अनेक फॅशन शो बघितले, उपस्थित राहिलो आहे, मात्र हा मिस / मिसेस / मिस्टर आणि किड्स फॅशन शो एक अनोखा अनुभव माझ्यासाठी होता, कारण पुण्याचे पॅडमॅन अशी ओळख निर्माण केलेल्या योगेश पवार यांच्या संकल्पनेतून हा शो महिलांच्या आरोग्य विषयक जनजागृती आणि सुरक्षा या विषया भोवती गुंफन्यात आला होता. या स्पर्धेतील विजेत्यांना आम्ही आमच्या आगामी अल्बम सॉन्ग मध्ये संधी देणार आहोत.

स्पर्धकांचा मेकअप वेलनेस वर्ल्ड ब्युटी स्कूल यांच्या वतीने करण्यात आला होता.

या स्पर्धेचे परीक्षण सपना भावे, प्रियंका मिसाळ, अभिनेत्री पूजा वाघ, प्रीती कोचर, प्रिया पाटील आणि माधवी बोकील यांनी केले. तर सूत्रसंचालन आरजे बंड्या यांनी केले.

### विजेत्यांची नावे

क्रितिका सिंह, पूनम मौर्य, आशिमा खन्ना, अक्षय मालुंजकर, आयांश गणपते, मिशिता शेट्टी, सानवी फाळके

### उपविजेत्यांची नावे

डिंपल डोगरा, जस्वीन सिंघ, उत्कर्ष गोरे, बलजीत, सार्थकी केदारी, सिया पाटील, हिमाली सावे, वैष्णवी कापले, विराज मिसुरकर, प्रेम शहा, प्रिया दिलोड, कविता पवार, स्नेहा पोतदार, टीना नेगी

## थोडक्यात पण महत्वाचे



### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

कोंढवे धावडे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी,एन डी ए, येथे शिवजयंती निमित्त, भव्य- दिव्य श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक, अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करण्यात आले. पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक मा सुभाष नाणेकर, कार्यक्षम नगरसेविका सौ धनश्री कोल्हे,भाजपा नेते मा अरूणभाऊ दांगट (पाटील),भाजप युवा मोर्चा अध्यक्ष मा निखिलजी धावडे (पाटील),जनसेवक मा गणेशभाऊ गवांडे (पाटील),उद्योजक मा सचिन कांबळे, नेते मा संतोष पवार,मा जाधव साहेब उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. त्यांच्या विचारांना आदर्श मानून जनतेचे प्रश्न सोडण्यासाठी कटिबद्ध राहू असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

### सॅमसंगच्या आगामी एआय स्मार्टफोनसाठी प्री-रिझर्वेशन ऑफर


पुणे (आरंभ पर्व) : भारतातील अग्रगण्य ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंगने त्यांच्या आगामी एआय-आधारित स्मार्टफोनसाठी प्री-रिझर्वेशन करणाऱ्या ग्राहकांसाठी विशेष सवलती आणि फायदे जाहीर केले आहेत. प्री-रिझर्वेशन करणाऱ्या ग्राहकांना २५६ जीबीवरून थेट ५१२ जीबीपर्यंत कॉम्प्लिमेंटरी मेमरी अपग्रेड दिले जाणार आहे. सॅमसंगचा नवीन एआय स्मार्टफोन २५ फेब्रुवारी रोजी सॅन फ्रान्सिस्को (कॅलिफोर्निया) येथे होणाऱ्या 'गॅलेक्सी अनपॅक्ड' कार्यक्रमात अधिकृतपणे लाँच होणार आहे. ग्राहक २५ फेब्रुवारीपर्यंत ९९९ रुपयांची रिफंडेबल टोकन रक्कम भरून नवीन गॅलेक्सी एस सिरीज स्मार्टफोन प्री-रिझर्व्ह करू शकतात. ही सुविधा Samsung.com, सॅमसंग एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, Amazon.in, Flipkart.com तसेच देशभरातील प्रमुख रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध आहे. स्टोरेज अपग्रेडसोबतच प्री-रिझर्वेशन करणाऱ्या ग्राहकांना नवीन गॅलेक्सी एस सिरीज डिव्हाइसच्या खरेदीवर सुमारे २६९९ रुपयांपर्यंतचे अतिरिक्त फायदेही मिळणार आहेत. ही नवीन सिरीज दैनंदिन वापर अधिक सुलभ करण्यासाठी, वापरकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि 'गॅलेक्सी एआय'चा प्रगत अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

### आंबी येथे डायलिसिस सेंटर सुरू; ग्रामीण रुग्णांना मोठा दिलासा



पानशेत (आरंभ पर्व) : आंबी व परिसरातील किडनी विकाराने त्रस्त रुग्णांसाठी दिलासादायक बाब म्हणजे आंबी येथे आधुनिक सुविधांनी सुसज्ज डायलिसिस सेंटर सुरू झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी पुणे शहरात किंवा दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. हॉस्पिटल इंचार्ज अमोल मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णांनी पूर्वनोंदणी करून आपले वैद्यकीय अहवाल डॉ. कदम यांच्याकडे पाठवावेत. तपासणीनंतर उपचाराची पुढील प्रक्रिया निश्चित केली जाणार आहे. नोंदणीसाठी ९९२१३३१८१५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शनिवार, ता. २१ रोजी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून सोमवारपासून प्रत्यक्ष डायलिसिस उपचारास सुरुवात होणार आहे. दरम्यान, डॉ विनोद शाह, अध्यक्ष जनसेवा फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आरोग्यविषयक योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. भविष्यात जनरल ऑपरेशनची सुविधाही उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे सांगण्यात आले. ग्रामीण भागातील रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'राजा शिवाजी'चे पोस्टर रिलीज; रितेश देशमुख महाराजांच्या भूमिकेत




पुणे (आरंभ पर्व) : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या औचित्याने जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' या बहुप्रतीक्षित ऐतिहासिक चित्रपटाचे अधिकृत पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. दिग्दर्शक रितेश विलासराव देशमुख यांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारत हा चित्रपट साकारला आहे. पोस्टरमध्ये रितेश देशमुख महाराजांच्या वेशात अत्यंत प्रभावी दिसत असून हातात भगवा ध्वज, चेहऱ्यावर करारी भाव आणि युद्धाच्या पार्श्वभूमीतील मांडणी महाराजांच्या शौर्याची प्रचिती देते. सुवर्ण अक्षरांतील शीर्षक आणि प्रकाशयोजनेतून चित्रपटाची भव्यता अधोरेखित होते. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' हा द्विभाषिक (मराठी व हिंदी) ऐतिहासिक ॲक्शन-ड्रामा असून स्वराज्य स्थापनेचा अद्वितीय प्रवास, त्याग, दूरदृष्टी आणि शौर्य यांचा सशक्त सिनेमॅटिक आविष्कार यातून मांडला जाणार आहे. अन्यायाविरुद्ध लढत स्वराज्याच्या स्थापनेची गाथा या चित्रपटातून उलगडणार आहे.

# सपकाळ यांच्या वक्तव्याचे निषेधार्थ धायरी फाटा येथे आंदोलन

## शिवरायांचा अवमान सहन करणार नाही



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ सिंहगड परिसरातील सकल हिंदू समाज व शिवप्रेमींकडून मंगळवारी (दि. १७ फेब्रुवारी) सायंकाळी धायरी फाटा येथील वांजळे पुलाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक, युवक आणि हिंदू बांधव उपस्थित राहून संताप व्यक्त केला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेले महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेली आक्षेपार्ह तुलना व वक्तव्य हे संपूर्ण महाराष्ट्राच्या भावना दुखावणारे असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. विचारसरणीचा निषेध करत घोषणाबाजी करण्यात आली. तसेच भविष्यात अशा प्रकारचे वक्तव्य कोणीही करू नये, अन्यथा जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनादरम्यान त्यांच्या प्रतिमेचे दहन करून निषेध नोंदविण्यात आला. "शिवरायांचा अपमान सहन केला जाणार नाही", "जय भवानी, जय शिवाजी" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. आंदोलन शांततेत पार पडले असून सामाजिक सलोखा अबाधित ठेवत शिवरायांप्रती असलेली निष्ठा व्यक्त करण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

या निषेध आंदोलनात संदीप जंगम, सचिन सोनावणे, सचिन पोल, आशिष बेनकर, दीपक चव्हाण, गणेश साखरे, खंडू बेनकर, गणेश पासलकर, अक्षय गावडे, गणेश चिंचोलकर, संतोष पटने, अक्षय उंदरे, अजिंक्य जाधव आणि गणेश खामकर , संतोष कदम यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या समवेत सिंहगड परिसरातील अनेक शिवप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान असून त्यांच्या बद्दल अनादर व्यक्त करणारी कोणतीही भूमिका समाज कधीही स्वीकारणार नाही, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी जनजागृती सुरू ठेवण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला.

## गिअर व पॉवर ट्रान्समिशन उद्योगाला नवी दिशा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पॉवर ट्रान्समिशन, प्रिसीजन ग्राइंडिंग आणि गिअर उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शन 'आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स २०२६' हे २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पुण्यातील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात येणार आहे. अमेरिकन गिअर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (AGMA) यांच्या पाठबळासह होणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन नामवंत औद्योगिक नेत्यांच्या हस्ते होणार आहे. या प्रदर्शनात गिअर कटिंग व ग्राइंडिंग मशिन्स, टूलिंग, मेट्रोलॉजी, फिनिशिंग, ऑटोमेशन आणि कंट्रोल सिस्टीम्स अशा संपूर्ण पॉवर ट्रान्समिशन मूल्यसाखळीतील तंत्रज्ञानाचे सादरीकरण केले जाणार आहे. उद्योगातील उत्पादक, तंत्रज्ञान पुरवठादार आणि तज्ज्ञांना एकत्र आणणारे हे जागतिक व्यासपीठ ठरणार असून, नव्या संधी आणि तांत्रिक देवाणघेवाणीस चालना मिळणार आहे.

## किलबिल इंग्लिश मीडियम स्कूल & ज्युनिअर कॉलेज येथे शिवजयंती साजरी



**धायरी (दै. आरंभ पर्व)**
किलबिल इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज धायरी रायकर मळा येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अत्यंत उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना तालुका प्रमुख दत्तानाना रायकर, अनिल रायकर,तसेच जेष्ठ नागरिक पंढरीनाथ रायकर, हनुमंत रायकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुरैय्या शेख, माधुरी पाटील, अंजुम शेख तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित विविध भाषणे सादर केली. तसेच पारंपरिक नृत्याविष्कार, शिवगर्जना, गड-किल्ल्यांची माहिती देणारी सादरीकरणे यांमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, नेतृत्वगुण व स्वराज्याची संकल्पना प्रभावीपणे मांडली. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, संस्कार व इतिहासाची जाणीव निर्माण करण्याचे काम शाळेमधून केले जाते.एकूणच शिवजयंतीचा हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी





**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यशवंत विद्यालय, खडकवासला येथे १८ ते १९ फेब्रुवारी दरम्यान दोन दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि प्रेरणा निर्माण करण्याचा उद्देश ठेवून अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. १८ फेब्रुवारी रोजी इयत्ता पाचवी ते सातवी (लहान गट) आणि आठवी ते अकरावी (मोठा गट) अशा दोन गटांमध्ये निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

१९ फेब्रुवारी रोजी मुख्य जयंती सोहळा दोन टप्प्यांत पार पडला. सकाळच्या सत्रात शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून यशवंत विद्यालय ते खडकवासला गाव अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. लेझीम, झांज पथक, पारंपरिक वेशभूषा आणि ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीने संपूर्ण गाव दुमदुमून गेले. विद्यार्थ्यांनी साकारलेले राजमाता जिजाऊ, मावळे तसेच 'प्रतिशिवाजी'च्या रूपातील पृथ्वीराज मते हे आकर्षण ठरले.

भैरवनाथ मंदिर परिसरात ग्रामस्थांनी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. सामाजिक कार्यकर्ते पै. राहुल मते ,अनिल मते यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या कार्याचा गौरव आपल्या मनोगतातून केला. दुसऱ्या सत्रात विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. यावेळी नगरसेविका सौ. धनश्रीताई कोल्हे, दत्ताभाऊ कोल्हे, विलास अण्णा मते, विजयभाऊ मते, माजी विद्यार्थी राहुल मते, प्राचार्य नंदकुमार फडतरे तसेच प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते. विद्यार्थिनींनी पोवाडे, भाषणे, 'शिवजन्म व पराक्रम' तसेच 'हिरकणी'वरील नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव वडेकर यांनी केले, तर वैशाली येवले यांनी आभार मानले. विद्यालय, स्कूल कमिटी, माजी विद्यार्थी संघटना व शिक्षकांच्या सहकार्याने हा सोहळा भव्यदिव्य स्वरूपात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## अशोक लेलँडची पश्चिम भारतात मोठ्या विस्ताराची योजना



- **प्रदेशातील विद्यमान 150 टचपॉइंट्सच्या जोडीला 30 नवीन टचपॉइंट्सची योजना**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
हिंदुजा समूहाची भारतीय प्रमुख कंपनी आणि देशातील अग्रगण्य व्यावसायिक वाहन उत्पादक अशोक लेलँड महाराष्ट्र आणि पश्चिम भारतातील मोठ्या भागात आपला मजबूत पाया अधिक बळकट करत आहे. प्रदेशातील भक्कम आर्थिक वाढ, वेगाने होणारा पायाभूत सुविधा विकास आणि वजनाने हलक्या व्यावसायिक वाहनांची (LCVs) वाढती मागणी यांचा लाभ घेण्याचा कंपनीचा उद्देश आहे. त्यायोगे सर्वोत्तम दर्जाची LCV उत्पादने व सेवा देण्याची आपली बांधिलकी आणखी मजबूत करत प्रदेशातील बाजारपेठेतील स्थान अधिक मजबूत होईल तसेच त्या भागातील विशिष्ट वाहतूक गरजा प्रभावीपणे पूर्ण करण्यास मदत होईल. पश्चिम भारतात, अशोक लेलँड LCV व्यवसायाकडे सध्या 29 डीलर भागीदार, 130 सेवा कार्यशाळा आणि 350 हून अधिक ALTT's (अशोक लेलँड ट्रेन्ड टेक्निशियन्स) आहेत. यामुळे दर 35 किलोमीटर अंतरावर सेवा उपलब्धता सुनिश्चित होते. पुढील एक वर्षात, कंपनी आपले सेवा जाळे वाढवून दर 25 किलोमीटर अंतरावर एक टचपॉइंट उपलब्ध करण्यासाठी कार्यरत आहे. अशोक लेलँडच्या LCV व्यवसायाचे प्रमुख श्री. विप्लव शाह म्हणाले, "महाराष्ट्र आणि संपूर्ण पश्चिम प्रदेशातील LCV नेटवर्किंगचा विस्तार आमच्यासाठी गेम चेंजर ठरेल. आमच्या LCV श्रेणीतून मिळणारे सर्वोत्तम दर्जाचे मायलेज, पेलोड, लोडिंग एरिया, कम्फर्ट आणि विश्वसनीयता यांसोबतच आता आम्ही आमची सेवा पोहोच वाढवण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत आहोत.

## द स्मार्टर ई इंडिया 2026 बनला गुजरातचा 'ऊर्जेचा महाकुंभ'

**गांधीनगर (दै. आरंभ पर्व)**
भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील वाढत्या गतीला चालना देणारा 'द स्मार्टर ई इंडिया 2026' हा कार्यक्रम २५ ते २७ फेब्रुवारीदरम्यान गुजरातमधील गांधीनगर येथे आयोजित करण्यात येणार असून, उद्योगजगताकडून त्याला 'ऊर्जेचा महाकुंभ' असे संबोधले जात आहे. तंत्रज्ञान, उत्पादन आणि ऊर्जा धोरणाशी संबंधित चर्चा एका व्यासपीठावर आणणारा हा देशातील सर्वात मोठ्या स्वच्छ ऊर्जा प्रदर्शनांपैकी एक ठरत आहे. भारताची स्वच्छ ऊर्जा यात्रा आता केवळ उद्दिष्टांपुरती मर्यादित न राहता अंमलबजावणीच्या टप्प्यात प्रवेशली आहे. या पार्श्वभूमीवर गुजरात उदयोन्मुख ऊर्जा केंद्र म्हणून पुन्हा चर्चेत आले असून, मोठ्या प्रमाणातील सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांसह राज्याची भूमिका अधिक बळकट होत आहे. मेस्से मुएनचेन इंडिया चे सीईओ आणि आयएमईएचे अध्यक्ष भूपिंदर सिंह यांनी सांगितले की, भारतातील ऊर्जा चर्चांचा केंद्रबिंदू आता उद्दिष्टांवरून अंमलबजावणी, पुरवठा साखळी आणि देशांतर्गत उत्पादनातील स्पर्धेकडे वळला आहे. 'द स्मार्टर ई इंडिया' हा बदल स्पष्टपणे दाखवतो, म्हणूनच उद्योगजगत त्याला ऊर्जा महाकुंभ मानू लागले आहे. या प्रदर्शनात ३०० हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार असून सौर ऊर्जा, ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक मोबिलिटी, पायाभूत सुविधा आणि ऊर्जा व्यवस्थापनाशी संबंधित तंत्रज्ञान सादर केले जाणार आहे. याशिवाय १९,००० हून अधिक व्यावसायिक अभ्यागत, ३०० हून अधिक विचारवंत आणि ६० हून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते परिषदांमध्ये सहभागी होणार आहेत. 'Adoption to Leadership: Powering Atmanirbhar Bharat through Technological Innovation' या मुख्य विषयावर परिषद आयोजित केली जाणार असून उत्पादन विस्तार, ग्रिड एकात्मीकरण, ऊर्जा साठवण, वित्तपुरवठा आणि धोरणात्मक समन्वय यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. कार्यक्रमात Innovator and Start-up Arena या विशेष विभागात ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक वाहन परिसंस्था, ग्रिड इंटेलिजन्स आणि प्रगत सौर उत्पादनाशी संबंधित स्टार्टअप्स आपली तंत्रज्ञान सादर करतील.

# काका, विकासासाठी झटतील : खा. सुप्रिया सुळे

## गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल काकासाहेब चव्हाण यांचे अभिनंदन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणेकरांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्ष सातत्याने कार्यरत राहील, असा विश्वास खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला. नगरसेवक काकासाहेब चव्हाण हे पुणे शहरातील विविध प्रश्न सोडवून विकासकामांना गती देतील, असेही त्या म्हणाल्या.

पुणे महानगरपालिकेला दिलेल्या भेटीदरम्यान खा. सुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी महानगरपालिकेतील गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल काकासाहेब चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना खा. सुळे म्हणाल्या की, काकासाहेब चव्हाण हे विकासदृष्टी असलेले नेतृत्व आहे. पुण्यातील स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अडचणी आणि प्रशासनिक बाबींचा त्यांना मोठा अनुभव आहे. त्यामुळे शहरातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यास ते सक्षम ठरतील. त्यांच्या पाठीशी पक्ष ठामपणे उभा राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीदरम्यान खा. सुळे यांनी काका चव्हाण यांच्या दालनातील दिवंगत नेते व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

यावेळी पुणे महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते नीलेश निकम , राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष माजी आ.सुनील टिंगरे, शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, नगरसेविका अनिता इंगळे, नगरसेवक गफूर शेख,माजी नगरसेवक विशाल तांबे, त्रिंबक मोकाशी, रुपेश घुले पाटील, शरद दबडे, अनिकेत चव्हाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रतिक्रिया देताना काकासाहेब चव्हाण म्हणाले की, शरदचंद्रजी पवार साहेब व अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टीतून पुणेकरांच्या विकासासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्न करू. सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन सत्ताधाऱ्यांकडून जास्तीत जास्त जनतेची कामे करून घेण्यावर भर राहील.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.